Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

परीक्षा प्राधान्य/महत्वाचे

क्र.रा.मं./परीक्षा-२/९०७
पुणे-४११ ००४
दिनांक- ०४/०३/२०२५

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
सर्व विभागीय मंडळे.

विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) फेब्रुवारी-मार्च २०२५ Out of Turn परीक्षांचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबत...

संदर्भ- या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-२/४२५ दि.३०/०१/२०२५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ अंतर्गत दिनांक १२/०३/२०२५, १५/०३/२०२५ व १७/०३/२०२४ या कालावधीमध्ये इयत्ता १२ वी व दिनांक १८/०३/२०२५ ते २०/०३/२०२५ या कालावधीमध्ये इयत्ता १० वी च्या प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन Out of Turn परीक्षांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सदर विद्यार्थ्यांचे गुण नोंदविण्याकरीता मंडळाचे संकेतस्थळ www.mahahsscboard.in वर Out of Turn mark ची लिंक Out of Turn परीक्षा कालावधीमध्ये सुरू राहील. त्याद्वारे सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये व माध्यमिक शाळा यांनी Out of Turn परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे गुण ऑनलाईन पध्दतीने नोंदवावयाचे आहेत. तसेच त्यामध्ये Absent दर्शविलेल्या विद्यार्थ्यांची खातरजमा करून अंतिम गुणतक्ते व लागू होणारे शुल्क चलनाने,ऑनलाईन अथवा रोखीने इयत्ता १२ वी साठी दिनांक २०/०३/२०२५ रोजी व इयत्ता १०वी साठी दिनांक २४/०३/२०२५ रोजी संबंधित विभागीय मंडळाकडे जमा करावयाचे आहेत.

सदर बाबी आपल्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

(देविदास कुलाळ)
सचिव
राज्य मंडळ, पुणे ०४.

क्र.कोविमं/माध्य./उच्च माध्य. गोप/ ४६०.
दिनांक - ०५/३/२०२५

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये
सातारा/सांगली/कोल्हापूर

उपरोक्त संदर्भिय पत्राची नोंद घेऊन त्यानुसार योग्य ती पुढील कार्यवाही करावी.

( सुभाष आर. चौगुले )
विभागीय सचिव ,
कोल्हापूर विभागीय मंडळ , कोल्हापूर

D/Patil/Endrosment